## नियमित दिवाणी दावा क्र. ८२/२०१४ मधील
## निशाण क्र. ११४ खालील आदेश
## CNR No.- MHRT050000771201 4

प्रस्तुत अर्ज हा वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०९ चे क्रम २२ नियम ४ व क्रम ६ नियम १७ प्रमाणे मयत प्रतिवादी क्र. ७ रघुनाथ गणपत कदम व प्रतिवादी क्र. १४ रविंद्र धोंडू कदम यांचे वारस अभिलेखावर घेणेकरीता व त्याप्रमाणे दाव्यामध्ये दुरूस्ती करण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. वादींचे कथनाप्रमाणे, प्रतिवादी क्र. ७ रघुनाथ गणपत कदम हे दिनांक ०२.०१.२०२१ रोजी वृधापकाळामुळे मयत झाले आहेत. तसेच प्रतिवादी क्र. १४ रविंद्र धोंडू कदम हे दि.०१.०५.२०२१ रोजी कोविड या रोगामुळे मयत झाले आहेत. प्रस्तुत प्रतिवादी क्र. ७ यांना ७अ. लक्ष्मी रघुनाथ कदम, ७ब. संजय रघुनाथ कदम तसेच प्रतिवादी क्र. १४ यांना १४अ रविप्रभा रविंद्र कदम, १४ब ऋषिकेश रविंद्र कदम व १४क अल्पेश रविंद्र कदम हे सरळ व कायदेशीर वारस आहेत, यांचे व्यतिरिक्त त्यांना अन्य कोणीही वारस नाहीत. त्यामुळे प्रतिवादी क्र.७ व १४ यांच्या वारसांना प्रस्तुतचे दाव्यात सामील करून त्यांच्याविरूध्द दावा चालविण्याचा हक्क वादी यांना आहे. प्रस्तुत प्रतिवादी क्र.७ व १४ यांचे वारस रेकॉर्डवर येणे आवश्यक आहे अन्यथा वादी यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.७ व १४ यांचे अर्जात नमुद केल्याप्रमाणे वारस रेकॉर्डवर घेऊन त्याप्रमाणे दुरूस्ती करणेची मागणी प्रस्तुत अर्जाव्दारे वादी यांनी केली आहे.

३. सदर अर्जावर प्रतिवादी क्र. १ व २ तर्फे म्हणणे देवून प्रस्तुत अर्जास विरोध दर्शविला आहे. त्यांनी सदरचा० अर्ज बेकायदा व मुदतबाह्य आहे तो खर्चासह फेटाळण्याची विनंती केली आहे.

४. मयत प्रतिवादी क्र. ७ व १४ यांचे वारसांनी याकामी हजर होवून नि.१२० कडे म्हणणे देवून मयत प्रतिवादी क्र. ७ व १४ यांचे वारस असलेचे कथन केले आहे. तसेच

त्यांचेव्यतिरीक्त अन्य कोणीही वारस नसल्याचेही म्हणणे दाखल केले आहे.

५. वादी व प्रतिवादीतर्फे सन्मानिय विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला, प्रकरणाचा अभिलेख पाहिला, प्रस्तुतचे अर्जाचे नैसिर्गिक निर्गतीकरीता खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात, त्यावरील माझे कारणासहीत निष्कर्ष नमुद केले आहेत ते खालील प्रमाणे

| अ.क. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी यांच्या मागणीप्रमाणे मयत प्रतिवादी क्र.७ व १४ यांचे वारस अभिलेखावर घेवून तशी दुरूस्ती करण्याचा आदेश मिळणेस वादी पात्र आहे का? | होय |
| २ | आदेश काय? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

**मुद्द क्र. १ व २**

६. प्रस्तुत दाव्याचे अवलोकन केले असता सदरचा दावा हा मिळकतीतील अतिक्रमण काढून मिळणेकरीता व निरंतर ताकीदीकरीता दाखल केला आहे. प्रस्तुत प्रकरणातील प्रतिवादी क्र.७ हे दि.०२.०१.२०२१ रोजी व प्रतिवादी क्र.१४ हे दि.०१.०५.२०२१ रोजी रोजी मयत झालेची बाब यातील इतर प्रतिवादी यांनी नाकारलेली नाही. वादी यांनी त्यांचे अर्जाचे पृष्टयर्थ शपथपत्र दाखल केलेले आहे तसेच मयत प्रतिवादी क्र. ७ व १४ यांच्या मृत्यु दाखल्यांच्या प्रतीदाखल केल्या आहेत. प्रतिवादी क्र.७ हे दि.०२.०१.२०२१ रोजी व प्रतिवादी क्र.१४ हे दि.०१.०५.२०२१ रोजी मयत झाले असल्याने वादी यांनी कायद्यातील तरतुदीनुसार त्यांचे कायदेशीर प्रतिनिधींना मुदतीत अभिलेखावर घेणे आवश्यक होते. परंतु वादी यांच्या कथनांचा विचार करता त्यांना कायद्याचे अज्ञान असल्याने अर्ज दाखल करण्यास विलंब झाला असल्याचे दिसून येते.

७. दाव्याचे स्वरूप व त्यामधील वादी यांची मागणी पाहता प्रतिवादी क्र. ७ व १४ यांचे कायदेशीर प्रतिनिधींना अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ न केल्यास सदर वादविषयाला घेवून भविष्यात वादी व प्रतिवादी यांचे वारसांचे दरम्यान अनेक दावे

दाखल होऊ शकतात. वादी यांची दाव्यातील मागणी पाहता प्रतिवादी क्र. ७ व १४ पश्चात सदर दावा चालविणेचा अधिकार त्याचे कायदेशीर प्रतिनिधींना प्राप्त होत असल्याचे दिसून येते. प्रस्तुत प्रतिवादी क्र.७ व १४ यांचे वारस अभिलेखावर घेतल्याने प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट वारस अभिलेखावर घेतले नाही तर वादी यांचे अपरिमित असे नुकसान होईल व प्रस्तुत दाव्यातील वादविषयाचे नैसर्गीक निर्गतीकरीता प्रतिवादी क्र.७ व १४ चे वारसांची याकामी उपस्थिती आवश्यक असल्याचे दिसून येते. प्रतिवादी क्र. ७ व १४ चे वारस अभिलेखावर घेणेस वादी यांना परवानगी दिल्यास नैसर्गिक न्यायादानास मदतच होणार आहे. त्यामुळे वादी यांना प्रतिवादी क्र. ७ व १४ चे वारसांना या कामी अभिलेखावर घेणेस परवानगी देवून तशी दुरूस्ती करणेस परवानगी देणे न्यायोचित ठरेल असे मला वाटते. याकारणास्तव मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र. २ करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करते.

## आदेश

१. अर्ज (नि. ११४) मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांना मयत प्रतिवादी क्र. ७ रघुनाथ गणपत कदम व प्रतिवादी क्र.१४ रविंद्र धोंडू कदम यांचे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी देण्यात येते.

३. वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.७ रघुनाथ गणपत कदम व प्रतिवादी क्र.१४ रविंद्र धोंडू कदम यांचे वारस अभिलेखावर घेवून तशी दुरूस्ती दाव्यात करुन दाव्याची दुरुस्त प्रत सदर प्रकरणात दाखल करावी तसेच दुरूस्त दाव्याची प्रत विरूध्द पक्षास पुरविण्यात यावी.

**दिनांक– २२.०२.२०२४**

**सही/–**
**(मनिषा म. पाटील)**
**२ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**
**खेड, ता. खेड, जि. रत्नागिरी**

## CERTIFICATE

| | | |
|---|---|---|
| Case No. | : | R.C.S. No. 82/2014 |
| I affirm that the contents of this pdf file order are same word as per original Judgment/order. | | |
| Name of Stenographer | : | Shri. V. V. Bamane |
| Court Name | : | 2nd Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Court, Khed. |
| Date of Decision | : | 22.02.2024 |
| Order signed by Presiding Officer on | : | 22.02.2024 |
| Judgment/Order uploaded on | : | 23.02.2024 |